१० वी आणि १२ वी नंतरचे

# शिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन

उत्तम पाटील

ॐ पब्लिकेशन्स्

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**शिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन : Shikshan Va Vyavsay Margdarshan**
उत्तम पाटील

**© उत्तम पाटील**
मु. पो. किणी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.
मोबा. ९८२ २२९० ९१७

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९६८ ९९९५ ३००

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १८०/-

# मनोगत

> ''पापा कहते है
> बडा नाम करेगा...
> मगर ये तो कोई न जाने,
> मेरी मंझील है कहाँ।''

प्रिय विद्यार्थी मित्रहो / पालकहो,

कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, इयत्ता ९ वी पासून १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना योग्य शैक्षणिक मार्गदर्शन मिळण्याच्या उद्दिष्टाने हे पुस्तक प्रकाशित करणेत आले आहे.

सामान्यपणे असे आढळून येते की, १० वी किंवा १२ वी नंतर अनेक विद्यार्थी आणि पालकसुद्धा कोणता व्यवसाय / शिक्षण पर्याय त्यांच्यासाठी योग्य आहे, याच्या गोंधळात पडलेले असतात आणि बऱ्याच व्यवसाय / शिक्षणक्रमाच्या निवडी उपलब्ध असल्याने अशी परिस्थिती होणे साहजिकच आहे.

म्हणूनच विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन पुरवण्यासाठी आम्ही व्यवसाय / शैक्षणिक मार्गदर्शन कार्यक्रम बहाल करत आहोत. ज्याचा विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यवसायाचा / शिक्षणक्रमाचा शोध घेताना निश्चितच पथदर्शक म्हणून फायदा होईल. तुम्ही योग्य व्यवसायाच्या शोधात असाल किंवा एखाद्या शैक्षणिक मार्गाचा अवलंब करू इच्छित असाल अगर पुढील शिक्षणासाठी अधिक माहिती मिळवत असाल किंवा भवितव्याबाबत योजना आखत असाल, तर हे पुस्तक निश्चितच आपल्याला उपयोगी ठरेल अशी आशा बाळगतो.

पण एक लक्षात ठेवा 'एच. डब्लू. लाँगफेलो' या तत्त्ववेत्याने म्हटल्याप्रमाणे, थोर लोकांनी पादाक्रांत केलेली यशाची शिखरे क्षणार्धात व सहजासहजी प्राप्त

केलेली नसतात. तर त्यांचे मित्र जेव्हा सुखा–समाधानात व ऐश्वर्यात लोळत असतात तेव्हा ही माणसे आपले जीवन घडवण्यासाठी रात्रंदिवस कष्ट उपसत असतात.

“सपने उन्हीं के सच होते है।
जिनके सपनो में जान होती है।
पंखो से कुछ नहीं होता।
हौसलों से उडान होती है।”

तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आमच्या हार्दिक शुभेच्छा ।

धन्यवाद !!!

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | १० वी आणि १२ वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन | ७ |
| २. | कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखा | ३२ |
| ३. | मानव्यविद्या | ३९ |
| ४. | कायदा (विधी) | ४२ |
| ५. | अध्यापन | ४५ |
| ६. | क्रीडा | ४९ |
| ७. | कृषी विज्ञान | ५४ |
| ८. | अभियांत्रिकी | ५७ |
| ९. | संगणक आणि माहिती तंत्रज्ञान | ६७ |
| १०. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था (I.T.I.) | ७८ |
| ११. | व्यावसायिक शिक्षण | १०७ |
| १२. | जैव तंत्रज्ञान | ११७ |
| १३. | व्यवस्थापन | १२४ |
| १४. | हॉटेल व्यवस्थापन | १४८ |
| १५. | सनदी हिशोब तपासनीस (C.A.) | १५१ |
| १६. | वैद्यकीय शिक्षण | १५७ |
| १७. | लोकसंभाषण | १६६ |
| १८. | ग्रंथालयशास्त्र | १८५ |

१९. हवाई सुंदरी प्रशिक्षण १९०
२०. फॅशन डिझायनिंग १९४
२१. संगीत २०२
२२. दूरस्थ शिक्षण २१०
२३. ऑनलाईन शिक्षण २१६
२४. अर्धवेळ शिक्षण २१८
२५. टपाल शिक्षण २२१
२६. परदेशी शिक्षण २२५
२७. प्रशिक्षण केंद्रे २२७
२८. साधने २३२
२९. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या संस्था २३५

✦✦✦

# १. १० वी आणि १२ वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

**११ वीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन –**

किशोरवयीन मुलांच्या जीवनात माध्यमिक शाळेत प्रवेश ही कदाचित एक महत्वाची बाब आहे. तुमच्या भविष्याबद्दल भक्कम योजना आखण्याची हीच वेळ आहे. याच गोष्टी तुमच्या उर्वरित आयुष्याचा मार्ग ठरवतील. ज्या क्षणी तुम्ही ११ वीत प्रवेश करता, तेव्हा तुम्हाला आपल्या विषय निवडीबाबत पूर्ण काळजी घ्यावी लागते.

१) या बाबतीत करण्यास सर्वात आदर्श गोष्ट म्हणजे विद्यानिष्ठ व्यक्ती, नातेवाईक आणि पालक यांचा सल्ला घेणे.

२) आजच्या काळात, विज्ञान, गणित , वाणिज्य किंवा कला यामध्ये पर्याय मर्यादित नाहीत. जर तुम्ही गणित, भौतिकशास्त्र आणि या क्षेत्राशी संबंधित कोणत्याही विषयात चांगले असाल आणि ते तुम्हाला आवडतही असतील तरच या विषयांची निवड करा. जर तुम्ही गणितात चांगले गुण मिळवले आहेत पण भौतिकशास्त्राची प्रयोगशाळा तुम्हाला आवडत नाही तर तुमच्यासाठी इतर पर्याय आहेत. जर तुम्हाला विज्ञान शाखेतील एखादा अभ्यासक्रम पूर्ण करायचा असेल तर सैन्यातील, नौदलातील किंवा तटरक्षक दलातील नोकरीचे पर्याय विद्यार्थ्यांना १० वी नंतर उपलब्ध आहेत. आय.टी.आय. च्या अभ्यासक्रमासाठी तुम्ही संस्थांची यादी पाहू शकता.

३) जर तुम्हाला लिखाणाची प्रचंड आवड असेल आणि भाषेवर चांगले प्रभुत्व असेल तर तुम्ही ११ वीला कला शाखेत जाऊ शकता आणि त्याचबरोबर तुमची लेखनकौशल्ये विकसित करू शकता. नंतर पदवी प्राप्त करण्याच्या कालावधीत तुम्ही पत्रकारितेत दाखल होऊ शकता.

४) त्याचप्रमाणे जर तुम्हाला संगीत, अभिनय किंवा मॉडेलिंगची आवड असेल तर १२ वी नंतर या क्षेत्रात करिअर करण्यासाठी उपयोगी पडतील असे विषय तुम्ही निवडू शकता. जर तुम्हाला एखाद्या खेळात करिअर करायचे असेल तर लाजू नका अगर चमत्कारिक वाटून घेऊ नका. याउलट अभ्यासाबरोबर खेळाचाही पाठपुरावा करा. त्या विशिष्ट खेळाच्या सरावासाठी भरपूर वेळ देता येईल असेच विषय निवडा. अनेक प्रकारे हे तुम्हाला मदत करेल–

१) खेळातील तुमच्या कारकीर्दीचा पाठपुरावा करण्यासाठी तुम्हाला खूप सोपे जाईल.

२) औपचारिक शिक्षणाला पर्याय नाही.

३) औपचारिक शिक्षण तुम्हाला खेळाचे सूक्ष्म भेद चांगल्या प्रकारे हाताळायला सुसज्ज करते.

४) औपचारिक शिक्षण तुमची खेळातील कारकीर्द संपल्यानंतरही, जीवनासाठी तुम्हाला तयार करते.

५) तुम्हाला विद्यापीठ पूर्व व विद्यापीठ स्तरावर तुमच्या कौशल्यांचे प्रदर्शन करण्यास संधी देते. यामुळे राष्ट्रीय संघातील तुमच्या निवडीची शक्यता वाढते. म्हणून ११ वीतील तुमचे विषय खूप शहाणपणपूर्वक व काळजीने विचारविनिमय करून निवडणे अत्यावश्यक बनते. अर्थातच तुम्हाला परिस्थिती, सामाजिक स्थान तुमच्या कुटुंबातील प्राधान्याच्या गोष्टी, तुमचे विशेष शारीरिक गुणधर्म, तुमच्या स्वतःच्या मर्यादा आणि क्षमता इ. चा योग्य विचार करावाच लागेल.

६) तथापि, तुमच्यादृष्टीने असलेल्या प्राधान्याच्या गोष्टी तुम्ही लक्षात ठेवल्या पाहिजेत.

७) तुमच्या आवडीच्या गोष्टीत तुम्ही तुमची शक्ती समर्पण केलीत तर शैक्षणिक क्षमता वाढते.

९) तुम्ही मन मोकळे ठेवले पाहिजे. कुणीतरी तुम्हाला सुचवते अगर तुम्हाला पटवून द्यायचा प्रयत्न करते म्हणून फक्त तुम्ही पारंपरिक व्यवसायात जाऊ नका.

१०) तुम्ही तुमच्या SWOT विश्लेषणाची मदत घेऊ शकता म्हणजेच Strength (क्षमता), Weakness (मर्यादा), Opportunities संधी आणि Threats (धोके), तुमची बलस्थाने अधिक वाढवा, दुर्बलता (मर्यादा) कमी करण्याचा प्रयत्न करा, तुमच्या मार्गात येणाऱ्या संधी पकडण्याचा प्रयत्न करा आणि कळणाऱ्या धोक्यांपासून सावध राहा. जर गरज भासलीच तर व्यावसायिक मानसरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

११) हल्ली ज्ञानात प्रचंड वाढ झाली आहे. निवडलेल्या व्यवसाय पर्यायाबाबत इतर मार्गांनी माहिती मिळवून मिळालेली माहिती बरोबर आहे की नाही ते ठरवा. व्यवसाय निवडीवर अगोदरच व्यवस्थित संशोधन करा.

१२) व्यावसायिक करिअर समुपदेशकाची मदत घेण्यास लाजू नका.

१३) स्वत:च्या क्षमतांवर कधीही संशय घेऊ नका. जेव्हा तुम्ही स्वत:च्या क्षमतांवरच संशय घेऊ लागता तेव्हाच अर्धीअधिक लढाई तुम्ही हरलेला असता.

१४) लक्षात ठेवा, यशाला सोपा मार्ग नाही पण त्याचबरोबर, जर तुमचा छंदच तुमचे व्यवसाय क्षेत्र बनले तर यशस्वी होण्याच्या शक्यता अनेक प्रकारे वाढतात.

जर तुम्ही विविध व्यवसाय आणि शैक्षणिक संधींवरती जेवढी शक्य असेल तेवढी जास्त माहिती मिळवलीत तरच तुम्हाला तुमच्या व्यवसाय निवडीतील सर्वोत्तम पर्यायापर्यंत पोहोचता येते. आपल्या कामाबद्दल कोणत्याही प्रकारचा दूषित पूर्वग्रह करून घेऊ नका आणि जरी प्रत्येक जण नेहमीच वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि मुलकी Civil सेवांना प्राधान्य देत असला तरी या व्यवसायांना पात्रतेपेक्षा जास्त श्रेष्ठपणा द्यायचे बंद करा. लक्षात ठेवा, आयुष्याच्या शेवटी तुम्ही तुमच्या कार्यात किती श्रेष्ठ ठरलात यालाच महत्त्व आहे, बाकीच्या सर्व गोष्टी क्षुद्र आहेत.

पुन्हा असे म्हणता येईल की, व्यवसायांची यादी कवीच्या कल्पनेप्रमाणे असते. प्रत्येकालाच या अनंत आकाशाखाली स्वत:चे स्थान आहे. जरी तुम्हाला कुणाचा पाठिंबा नसला तरी सुध्दा आपल्या आवडीचं व्यवसाय क्षेत्र निवडून या जगात तुम्ही आपला ठसा उमटवू शकता. गणित अगर विज्ञानात तुम्ही चांगले नसलात तरी देखील तुम्ही वाणिज्य, मानव्यविद्या आणि व्यवसाय अभ्यासक्रमात भरपूर निर्माण झालेल्या पर्यायांमधून तुमच्या आवडीचा पर्याय निवडू शकता.

**विज्ञान / वाणिज्य / मानव्यविद्या / नोकरी माहितीपत्रक –**

तुमच्या जीवनातील अनेक निर्णायक क्षणांपैकी एक शक्यतो कोणत्या मार्गाने तुम्ही कृती कराल ? यासारखे अनेक विचार तुमच्या मनात निर्माण होतील. लक्षात घ्या तुमचा कोणताही निर्णय तुमच्या व्यावसायिक जीवनावर सखोल परिणाम करणारा ठरणार आहे, यामुळे अत्यंत काळजीपूर्वक वाटचाल करण्याची गरज आहे. याचा अर्थ असा नाही की, एकूण एक सल्ल्यासाठी व समुपदेशनासाठी तुम्ही धावाधाव करावी. कारण जोपर्यंत तुम्हाला तुमच्या परिस्थितीची जाणीव होत नाही तोपर्यंत कोणत्याही समुपदेशकाच्या सल्ल्याने फारसा फरक पडणार नाही. आपण शाखांनुसार कृतीच्या मार्गांचा विचार करणार आहोत.

**विज्ञान –**

तुम्ही करण्याजोगी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही कुठे आहात याची पूर्ण तपासणी करा. म्हणजेच तुमच्या व्यवसायाची प्रतिष्ठा काय आहे याची तपासणी करा. यासाठी पुढील गोष्ट विचारात घ्यावी लागेल – १० वी नंतर तयार केलेल्या योजनांचा तुम्ही कितपत चांगला पाठपुरावा केला. जर तुम्हाला अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय सेवेत जाण्याची इच्छा होती तर या परीक्षांसाठी तुम्ही कुठपर्यंत तयारी केली. लक्षात ठेवा जर तुम्हाला IIT आणि AIIMS सारख्या प्रमुख अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय संस्थांमध्ये प्रवेश घ्यायची इच्छा असेल तर मध्ये एक वर्षाचा खंड ठेवणे योग्य होईल. पण जर तुम्हाला असे वाटत असेल की, तुम्हाला प्रमुख संस्थांमध्ये प्रवेश मिळणार नाही, पण तुम्हाला अभियंत्याबरोबर किंवा डॉक्टरांसमवेत काम करण्याची इच्छा असेल तर दु:खी होण्याची काही गरज नाही. IIIT, NIT, BIT इ. अभियांत्रिकी शाखेची खाजगी महाविद्यालये आणि राज्य CPMT तसेच इतर अनेक खाजगी वैद्यकीय महाविद्यालये आहेत जे CET मार्फत प्रवेश देतात.

अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय सेवेत रुजू होऊ इच्छिणाऱ्यांसाठी हा वर चर्चा केलेला कृतीचा मार्ग चांगला आहे. संशोधक, शास्त्रज्ञ किंवा विद्यानिष्ठ व्यक्ती बनण्याच्या हेतूने विज्ञानाची पार्श्वभूमी घेऊन उच्चशिक्षित होऊ इच्छिणारेही काही विद्यार्थी आहेत. अशा वेळेस दूरदर्शी योजनांबरोबरच तुमच्याकडे उच्च अभ्यासक्रमासाठी ढोबळमानाने ठरविलेल्या विशेष अभ्यासक्रमाची कल्पना हवी.